महाराष्ट्र टाइम्स

मंगळवार, १८ फेब्रुवारी २०२०

'विवेकी जोडीदार निवडा'

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज विद्यार्थी कक्ष आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या संयुक्त विद्यमाने जोडीदाराची विवेकी निवड या विषयावर संवादशाळा झाली. प्रा. एस. एम. रुईकर यांच्या हस्ते या कार्यशाळा झाली.

रुईकर म्हणाले, 'आज समाजात लग्न ठरवताना पत्रिका, गोत्र, जात जुळते का बघितली जाते. पण पत्रिकेतील गुणापेक्षा मन जुळतात की नाही हे पाहून लग्न ठरवण्याला प्राधान्य दिले पाहिजे.'

शोभा रामचंद्र, हर्षल जाधव, विभावरी नकाते यांनी मार्गदर्शन केले. संवादशाळेत डॉ. कविता तिवडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. श्रुती जोशी यांनी आभार मानले. प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. सुप्रिया पाटील, डॉ. एच. व्ही. चामे, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. कैलास पाटील, डॉ. सोमनाथ काळे, प्रा. सलमा मणेर उपस्थित होत्या.

पुढारी

मंगळवार, १८ फेब्रुवारी २०२०

'विवेकानंद'चा २९ रोजी पदवी प्रदान समारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद महाविद्यालयाचा पदवी प्रदान समारंभ शनिवारी (दि. २९) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे सकाळी ९.३० वाजता होणार आहे.

समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून इस्लामपूरचे पोलिस उपअधीक्षक कृष्णात पिंगळे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पदवी प्रदान व मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे असणार आहेत. संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळातील निमंत्रित सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, परीक्षा विभागप्रमुख प्रा. डॉ. जी. जे. नवाथे यांनी केले आहे.